**CNRNo.MHJG15000789-2022** **S.C.C. No. 303 of 2022**

**Ex.** ३ लगत

# न्यायनिर्णय

1. आरोपी क्र.१ ते ३ यांचेवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हयाचा आरोप आहे. आरोपी न्यायालयासमोर हजर झाले. आरोपींनी गुन्हा कबूल केला. आरोपींनी कबूल केलेल्या गुन्हयाचे शिक्षेकरिता मा.सरकारी वकिल यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

2. आरोपी क्र.१ ते ३ यांनी गुन्हा कबूल केल्याने त्यांना होणा-या शिक्षेबाबत त्यांचे म्हणणे विचारात घेण्यात आले. आरोपींनी विनंती केली की, सदरच्या गुन्हयामध्ये त्यांचा कोणताही हेतूपुरस्पर किंवा जाणीवपुर्वक निष्काळजीपणा, हलगर्जीपणा नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती सधन नाही. त्यांचे कुटुंब त्यांचेवरती अवलंबून आहे. त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाल्यास त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल. तसेच, त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने कमीतकमी दंडाची शिक्षा करावी.

3. मी खटल्यातील कागदपत्रे बारकाईने पाहिली. खटल्यातील कागदोपत्री पुरावा पाहता, आरोपींचा गुन्हा हा सहेतूक असला तरी, त्यांना या गुन्हयाचा पश्चाताप होत आहे. आरोपी हे गरीब कुटुंबातील आहेत.

4. आरोपी क्र.१ ते ३ यांनी आज रोजी गुन्हा कबूल करुन कमीतकमी शिक्षा देण्याची विनंती केली आहे. वरील सर्व बाबी, आरोपींची परिस्थिती तसेच, गुन्हयाचे स्वरुप विचारात घेउन आरोपींना कोर्ट उठे पावेतो कारावासाची आणि आर्थिक दंड करणे न्यायोचित होईल. मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

1. आरोपी **क्र.१** बापु राजाराम भोई, **क्र.२** सचिन दत्तात्रय चौधरी, **क्र.३** संजय लालचंद मराठे यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ नुसार दोषी ठरविण्यात येत आहे.

2. आरोपी क्र.१ ते ३ यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु ३००/-(रुपये तीनशे मात्र) दंड तसेच कोर्ट उठे पावेतो कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. त्यांनी दंड न भरल्यास दहा दिवस साधी कैद भोगावी लागेल.

3. मुद्देमालखटल्यातील जप्त मुददेमाल न्यायालयात हजर करण्यात आला नाही. अपील कालावधी संपल्यानंतर जप्त रोख रुपये १२००/- ही रक्कम सरकार जमा करण्यात यावी, ५२ पत्यांचा कॅट निरुपयोगी असल्याने त्याचा नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा व याबाबत पोलीस निरीक्षक, कासोदा पो.स्टे. यांनी अहवाल दाखल करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2022.11.12 16:03:38 +0530

एरंडोल
ता. १२/११/२०२२

**(विशाल श्रावण धोंडगे)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, एरंडोल

| | | |
|---|---|---|
| निकाल घोषित केल्याची तारीख | :- | १२/११/२०२२ |
| निकाल टंकलिखित केल्याची तारीख | :- | १२/११/२०२२ |
| निकालावर सही केल्याचा दिनांक | :- | १२/११/२०२२ |